दि. ०८/०५/२०२३

लोकसत्ता पा. नं. १

# कर्नाटकला तोडण्याचा प्रयत्न

## पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा गांधी कुटुंबावर आरोप, प्रचाराची आज सांगता

वृत्तसंस्था, बंगळुरू/म्हैसुरू

कर्नाटक विधानसभा निवडणुकीचा प्रचार आज, सोमवारी संपत असताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी आपल्या प्रचाराची सांगता केली. यावेळी ''काँग्रेसचे शाही कुटुंब (गांधी परिवार) कर्नाटकला भारतापासून तोडण्याचा प्रयत्न करीत असल्याचा आणि देशहिताविरुद्ध काम करण्यात पुढाकार घेत असल्याचा,'' आरोप त्यांनी केला.

म्हैसुरू जिल्ह्यातील नंजनगुडु येथील प्रचारसभेत मोदी यांनी काँग्रेसवर गंभीर आरोप केले. काँग्रेस पक्षाचा शाही परिवार देशाच्या राजकारणावर वर्चस्व गाजविण्यासाठी परदेशी शक्तींना उघडपणे चिथावणी देत आहे. भारताचा द्वेष करणाऱ्या परदेशी राजनैतिक अधिकाऱ्यांच्या हे कुटुंब गुप्तपणे भेटी घेत आहे, असाही आरोप मोदी यांनी केला.

दरम्यान, कर्नाटक विधानसभा निवडणुकांच्या प्रचारासाठी गेल्या काही दिवसांपासून भाजप, काँग्रेस आणि जनता दल (धर्मनिरपेक्ष) या तिन्ही प्रमुख पक्षांच्या प्रमुख नेत्यांचा तोफखाना राज्यभर धडधडत होता. भाजपतर्फे पंतप्रधान मोदी, गृहमंत्री अमित शहा, अर्थमंत्री निर्मला सीतारामन, परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर, स्मृती इराणी, नितीन गडकरी, जे. पी. नड्डा यांच्यासह भाजपशासित राज्यांचे मुख्यमंत्री आदींनी प्रचारसभांचा धडाका उडवला. प्रत्येक निवडणुकीनंतर सरकार बदलण्याचा गेल्या ३८ वर्षांचा पायंडा मोडून सलग दुसऱ्यांदा सत्ता राखण्याचा भाजपचा प्रयत्न आहे, तर भाजपकडून सत्ता खेचायचीच, या निर्धाराने काँग्रेसने आपली सर्व शक्ती पणाला लावली आहे. काँग्रेसच्या वतीने माजी अध्यक्ष (पान १० वर)



प्रचाराच्या अखेरच्या रविवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी कर्नाटकची राजधानी बंगळुरूमध्ये 'रोड शो' केला. यावेळी रस्त्याच्या दुतर्फा नागरिकांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती.



कर्नाटकमध्ये प्रचारासाठी आलेले काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी हुबळीमधील आपल्या सभेपूर्वी चक्क अन्नपदार्थ पोहोचविणाऱ्या 'डिलिव्हरी बॉय'बरोबर दुचाकीवरून फेरफटका मारला.




### नेत्यांचा प्रचारवार

- प्रचाराचा शेवटचा रविवार सर्वच प्रमुख पक्षांच्या नेत्यांच्या सभांनी गाजला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी सकाळी बंगळूरुत रोड शो केल्यानंतर दुपारी दोन प्रचारसभा घेतल्या.
- गृहमंत्री अमित शहा यांनीही रोड शो केला, तर महाराष्ट्रातून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हेही प्रचारात सहभागी झाले.
- काँग्रेसतर्फे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, राहुल गांधी, प्रियांका गांधी यांनीही तोडीसतोड प्रचार केला.

### 'मोदी यांच्याकडे पुरावे का मागत नाही?'

नवी दिल्ली : काँग्रेस मागच्या दाराने दहशतवादाशी संबंधित लोकांशी राजकीय वाटाघाटी करत असल्याच्या पंतप्रधान नरेंद्र मोदींनी केलेल्या आरोपावर निवडणूक आयोग पुरावे का मागत नाही, असा सवाल राज्यसभा खासदार कपिल सिबल यांनी रविवारी केला. काँग्रेसच्या एका जाहिरातीमध्ये भाजपविरुद्ध केलेल्या भ्रष्टाचाराच्या आरोपांसंदर्भात निवडणूक आयोगाकडून खुलासा मागविला आहे. त्या पार्श्वभूमीवर सिबल यांनी आयोगावर तोफ डागली आहे. - पान ४

'डबल इंजिन' सरकारचे सूत्र कर्नाटकात कायम ठेवा - शिंदे / पान ४

CS CamScanner
Scanned with CamScanner

दि. ०८/०४/2023

म. टा. पु. पा. नं. १

# ज्वेलर्स दुकानावर दरोडा टाकण्याचा डाव फसला

म. टा. वृत्तसेवा, मिरा-भाईंदर

भाईंदरमध्ये एका ज्वेलर्स दुकानात दरोडा टाकण्यासाठी आलेल्या एका अल्पवयीन मुलाला शनिवारी पकडण्यात आले आहे. हे कृत्य अल्पवयीन मुलाने शेअर बाजारात अधिकची गुंतवणूक करण्यासाठी लागणारे पैसे उभारण्यासाठी केले असल्याची बाब पोलिस तपासात समोर आली आहे. या प्रकरणी एका तरुणाला ताब्यात घेण्यात आले आहे.

भाईंदर पश्चिमेच्या शक्ती ज्वेलर्समध्ये शनिवारी दुपारी साडेचारच्या सुमारास एक तरुण आला. त्याने ज्वेलर्स दुकानदाराला सोन्याचे बिस्किट विकायचे असल्याचे प्रथम सांगितले. त्यावर दुकानदाराने त्याला नकार देत पळवून लावले. काही वेळानंतर पुन्हा हाच तरुण तोंडावर मास्क लावून दुकानात शिरला. त्याने बंदुकीच्या धाकाने दरोडा टाकण्याचा प्रयत्न केला. परंतु दुकानदाराने त्याला चकवा देत दुकानाबाहेर पळ काढून आरडाओरड केली. त्यामुळे घटनास्थळी जमा झालेल्या नागरिकांनी तरुणाला पकडून पोलिसांच्या ताब्यात दिले.

हा तरुण १६ वर्षीय असून भाईंदर येथीलच राहणार आहे. त्याने ज्वेलर्स दुकानदाराला धाक दाखवण्यासाठी वापरलेली बंदूकही बनावट असल्याचे निदर्शनास आले. या प्रकरणाच्या पोलिसांनी अधिक केलेल्या तपासात हा तरुण अभ्यासात हुशार असून तोच घरातील बँकेशी संबंधित व्यवहार पाहत होता. त्याला शेअर बाजारातील माहिती असल्याची बाब समोर आली आहे. शेअर बाजारात अधिकची गुंतवणूक करून नफा मिळवायचा होता. त्यासाठी त्याने परिचित काही व्यक्तींकडे पैशांची मागणीदेखील केली होती. त्यांनी पैसे देण्यास नकार दिल्यामुळे त्याने थेट ज्वेलर्स दुकानात दरोडा टाकण्याचा कट रचला.

## शेअर बाजारातील गुंतवणुकीसाठी अल्पवयीनाकडून कृत्य



म. टा. पु. पा. नं. १

# साडेआठ लाखांचे अमली पदार्थ जप्त

मिरा-भाईंदर : मिरा-भाईंदरमध्ये विक्रीसाठी आणण्यात आलेले सुमारे साडेआठ लाखांचे एमडी घोडबंदर परिसरातून जप्त करण्यात आले आहे. पोलिस उपायुक्तांच्या पथकाने ही कारवाई केली.

घोडबंदर परिसरात एका चाळीत एमडीची विक्री करण्यासाठी त्याचा साठा करण्यात आल्याची माहिती पोलिस उपायुक्त जयंत बजबळे यांना गुप्त बातमीदारांकडून मिळाली होती. त्यानुसार त्यांच्या पथकाने नुकताच येथील रेतीबंदर भागात छापा टाकला. यावेळी १०८ ग्रॅम वजनाचे एमडी त्यांना मिळाले.

लोकमत पु. पा. नं. १

# सीसीटीव्ही जाळ्यासाठी मिळणार १७५ कोटी

लोकमत न्यूज नेटवर्क

मीरा रोड : गुन्हेगारीला आळा घालण्यात महत्त्वाचे ठरलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे जाळे व अद्ययावत नियंत्रण कक्ष उभारणीसाठी शासनाने २०२० साली मंजूर केलेल्या १७५ कोटींच्या प्रकल्पाचा निधी देण्याचे आश्वासन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिल्याचे आमदार गीता जैन यांनी सांगितले आहे.

सीसीटीव्हीचे महत्त्व पाहून तत्कालीन आयुक्त सदानंद दाते यांनी महापालिका व शासनावर अवलंबून न राहता लोकसहभागातून शहरात सीसीटीव्हीचे जाळे उभारले, तर पालिकेनेदेखील खर्च करून सीसीटीव्ही बसवले. सीसीटीव्हीमुळे अनेक गंभीर गुन्हे उघडकीस आले आहेत. मीरा-भाईंदरमध्ये सीसीटीव्हीचे जाळे तयार करणे व अद्ययावत नियंत्रण कक्ष उभारण्यासाठी पालिकेने १७५ कोटींचा प्रस्ताव गृह विभागाकडे पाठवला असता २०२० सालात तो मंजूर झाला आहे; परंतु त्या कामासाठी निधी शासनाकडून मिळालेला नाही. हा निधी मिळावा यासाठी आमदार गीता जैन या शासनाकडे पाठपुरावा करत आहेत.

उपमुख्यमंत्री फडणवीस हे भाईंदर येथील पालिकेच्या सीसीटीव्ही नियंत्रण कक्षाच्या उद्घाटनास आले असता जैन यांनी १७५ कोटींच्या मंजूर प्रकल्पासाठी निधी मिळत नसल्याने सीसीटीव्ही कॅमेरे व नियंत्रण कक्षाचे काम रखडल्याचे निदर्शनास आणून दिले होते.

त्यावेळी फडणवीस यांनी प्रकल्प उभारणीच्या कामास निधी देण्याचे आश्वस्त केले होते. आ. जैन यांनी फडणवीस यांची मंत्रालयात भेट घेऊन प्रलंबित सीसीटीव्ही प्रकल्पाबद्दल निवेदन देऊन निधी वितरित करण्याची विनंती केली.

CS CamScanner
Scanned with CamScanner

दि. ०८/०५/२०२३

पुढारी पा.न. १

# मणिपुरात २३ हजार जणांना सुरक्षितस्थळी हलवण्यात यश

## परिस्थितीवर लष्कराचे नियंत्रण : गस्तीसाठी हेलिकॉप्टर, ड्रोनचा वापर

**इम्फाळ : वृत्तसंस्था**

आठवडाभरापासून दंगलीत होरपळणाऱ्या मणिपूरमध्ये तैनात करण्यात आलेल्या लष्कराने २३ हजार नागरिकांना दंगलग्रस्त भागांतून सुरक्षितस्थळी हलवले आहे. लष्कराने इम्फाळ, चुराचांदपूरसह अतिसंवेदनशील भागांत पकड मजबूत केली असून परिस्थिती आटोक्यात आणण्यात यश मिळवले आहे. ड्रोन आणि हेलिकॉप्टरच्या मदतीने लष्कर इम्फाळ खोऱ्यावर नजर ठेवून आहे.

मैतेयी विरुद्ध इतर जमाती यांच्यात अनुसूचित जातीत समाविष्ट करण्यावरून पेटलेल्या संघर्षाने अवघे राज्य दंगली अनुभवत आहे. या साऱ्या चकमकींचे केंद्र चुराचांदपूर होते. तेथून ही दंगल पसरत गेली. या दंगलीत आतापर्यंत ५४ जणांचे बळी गेले आहेत तर हजारो नागरिकांनी राज्याबाहेर स्थलांतर केले आहे. दंगल आटोक्यात आणण्यासाठी लष्कराला पाचारण करण्यात आले असून लष्कराच्या अनेक तुकड्या तैनात करण्यात आल्या आहेत. दंगलग्रस्त भागांत अडकलेल्या लोकांना सुरक्षित बाहेर काढण्याची जबाबदारी लष्कराने उचलली असून आतापर्यंत २३ हजार जणांना बाहेर काढण्यात यश आले आहे.

लष्कराने जारी केलेल्या निवेदनात म्हटले आहे की, गेल्या ९६ तासांपासून लष्कर आणि आसाम रायफल्सच्या १२५ तुकड्या म्हणजे दहा हजारांहून अधिक जवान तैनात करण्यात आल्या असून दंगलग्रस्त

/...२

### मराठी विद्यार्थ्यांना विमानाने परत आणणार : मुख्यमंत्री



**मुंबई :** मणिपूरमध्ये भडकलेल्या जातीय हिंसाचारामुळे तेथील परिस्थिती गंभीर बनली असून येथे राज्यातील २२ तरुण अडकून पडले आहेत. त्यांना सुखरूप आणण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मणिपूरचे मुख्यमंत्री एन. बिरेन सिंह आणि आसामचे मुख्यमंत्री हेमंत बिस्वा सरमा यांच्याशी दूरध्वनीवरून संवाद साधला. यावेळी मणिपूरमध्ये अडकलेल्या मराठी तरुणांना सुरक्षा पुरवण्याबाबत चर्चा करण्यात आली. त्यापैकी १४ मराठी विद्यार्थ्यांना मणिपूर येथील शिवसेना भवनात सुखरूप आणण्यात आले आहे. उर्वरित आठ जणांनाही त्या ठिकाणी आणण्यात येणार आहे.

महाराष्ट्रातील २२ विद्यार्थी हे मणिपूरमध्ये

/...२

पुढारी पु. पा.न. ३

# वसई पालिकेची करवसुलीत आघाडी

## शहर विकास शुल्क महसूल पोहोचला ३१५ कोटींवर

**विरार : पुढारी वृत्तसेवा**

वसई-विरार महानगरात बांधकाम उद्योग मोठ्या प्रमाणात आहे. शहर नियोजन विभागाकडे नवनव्या बांधकामाची परवानगी घेण्यासाठी लहान-मोठे विकासक, करदाते सतत आपले प्रस्ताव देऊन विकास शुल्क भरीत असतात. यंदा पालिकेकडे विकास शुल्क उत्पन्नाची देखील चांगली कमाई झाली आहे. मागील वर्षी मालमत्ता करची विक्रमी वसुली केलेल्या वसई-विरार महानगरपालिकेने शहर विकास विभागातूनही विकास शुल्क म्हणून मिळणारा विक्रमी महसूल जमा केला. २०२२-२३ या आर्थिक वर्षात शहर विकास शुल्कातून ३१५ कोटी जमा झाले. मागील वर्षांच्या तुलनेत ही विक्रमी वाढ असल्याचे पालिकेतर्फे सांगण्यात आले. २०२१-२२ या वर्षात हाच महसूल १९० कोटी रुपये होता.

वसई-विरार महानगर पालिकेने २०२२-२३ या वर्षात ३७२ कोटींची मालमत्ता कराची विक्रमी वसुली केली होती. शहर विकास विभागाकडूनही विक्रमी वसुली करण्याचा प्रयत्न पालिकेने सुरु केला. त्यामुळेच मागील वर्षात म्हणजेच २०२१-२२ या वर्षात शहर विकास विभागाकडून १९० कोटींची वसुली झाली. २०२२-२३ या वर्षात हा आकडा ३१५ कोटींवर गेला. राज्यातील काही महापालिकांच्या शहर विकास विभागाकडून मागील दोन वर्षांच्या तुलनेत २०२२-२३ या वर्षात कमी महसूल जमा झाल्याचे दिसून आले होते.

यासाठी कोरोना काळात पालिकेने विकास शुल्क आणि प्रिमियम यामध्ये टप्प्याटप्प्यांत भरायच्या महसुलाची उर्वरित टप्प्यातील वसुली मागील आर्थिक वर्षात करुन घेतली. त्यामुळे ती वसुली २५ टक्के झाली. अजुनही



मागील ७५ टक्के विकास शुल्काची वसुली बाकी आहे.

बांधकाम पूर्ण झालेल्या अनेक इमारती वाढीव बांधकाम किंवा अनधिकृत बांधकाम केल्याने भोगवटा प्रमाणपत्र (ओसी) मिळविण्यासाठी टाळाटाळ करतात. त्यामुळे पालिकेचे उत्पन्न बुडते. उत्पन्न वाढीसाठी पालिकेने बांधकाम पूर्ण झालेल्या मात्र ओसी न घेतलेल्या इमारती शोधण्यास सुरुवात केली. अशी एकूण १४०० प्रकरणांचा शोध घेतला. त्यापैकी ९५० बांधकामांना नोटिसा बजावल्या.

त्यानंतर या विकासकांची आणि वास्तुविशारदांची बैठक घेऊन ओसीबाबत (नव्या इमारतींचा बांधकाम पूर्ण झाल्याचा बांधकामकर्त्याला पालिका शहर नियोजन विभागाचा रितसर दाखला) विचारणा केली. बांधकाम पूर्ण होऊनही ओसी न घेतल्याने बांधकामांवर कारवाई का करु नये, तसेच सीसी रद्द का करु नये याबाबत खुलासा मागविला होता. तसेच कारवाईचा इशारा दिला.

या सगळ्या नियमावलींची पूर्तता करताना द्यावयाच्या कराच्या ७०० कोटींपेक्षा जास्त महसूल पालिकेला अपेक्षित आहे. मात्र मागील आर्थिक वर्षात या सर्व कारवायांतून १५० कोटींच्या आसपास महसूल वसूल झाला. यामुळेच २०२२-२३ वर्षात शहर विकास शुल्कातून पालिकेने वसुली केल्याचे पालिका आयुक्त अनिलकुमार पवार यांनी सांगितले.

CamScanner
Scanned with CamScanner

सामना पा. न. ८

# वसईत शिवसेनेचाच आवाज घुमणार

## मार्गदर्शन मेळाव्यास उदंड प्रतिसाद



वसई, दि. ७ (सा.वा.) - शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांचे विचार संपूर्ण तालुक्यात तळागाळापर्यंत पोहोचवणार असून ऐतिहासिक वसईत फक्त शिवसेनेचाच आवाज घुमेल, असा विश्वास पालघर जिल्हाप्रमुख पंकज देशमुख यांनी व्यक्त केला आहे. स्वत:च्या स्वार्थासाठी काहींनी भगव्याशी गद्दारी केली असली तरी या गद्दारांना त्यांची जागा निष्ठावंत शिवसैनिक दाखवून देतील, असेही त्यांनी ठामपणे सांगितले.

वसई शहर प्रभाग समिती 'आय' क्षेत्रात झालेल्या या मार्गदर्शन मेळाव्यास उदंड प्रतिसाद मिळाला. विविध भागांतून मोठ्या संख्येने शिवसैनिक आले होते. यावेळी १३० पदाधिकाऱ्यांच्या नेमणुका जाहीर करून त्यांना नियुक्तीपत्रेही देण्यात आली. जिल्हाप्रमुख पंकज देशमुख यांच्यासह अन्य पदाधिकाऱ्यांनीही मेळाव्यास मार्गदर्शन केले.

वसई विधानसभा संपर्कप्रमुख जगदीश कदम, माजी जिल्हाप्रमुख शिरीष चव्हाण, माजी विरोधी पक्षनेते विनायक निकम, उपजिल्हाप्रमुख प्रवीण म्हाप्रळकर, उपजिल्हाप्रमुख जनार्दन म्हात्रे, जिल्हा सचिव मिलिंद खानोलकर, तालुका सचिव शाम शिरोडकर, ग्राहक संरक्षण कक्ष माजी जिल्हाप्रमुख शंकर बने, जिल्हा युवा अधिकारी सिद्धेश जोगळे, उपतालुकाप्रमुख सुनील मुळे, हरिहर पाटील, जिल्हा कार्यकारिणी सदस्य सुनील बालेकर, उपजिल्हा संघटक मनाली चौधरी विधानसभा समन्वयक नयना वर्तक आदी पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत हा मार्गदर्शन मेळावा पार पडला. वसई शहरप्रमुख प्रथमेश राऊत यांनी या मेळाव्याचे आयोजन केले होते. यावेळी उपशहरप्रमुख नीलेश भानुशे, उपशहरप्रमुख भुपेश राऊत, महिला शहर संघटक संगीता भोईर आदी उपस्थित होते.

## यावेळी नियुक्त्या जाहीर करून पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्रे देण्यात आली

विभागप्रमुख - अशोक सुळे (बंगली सांडोर). उपविभागप्रमुख : जॉजी थॉमस (बंगली सांडोर). शाखाप्रमुख : सलीम सय्यद (बंगली सांडोर). उपशाखाप्रमुख : गणेश महाडिक, एन. नाडर, शशी चव्हाण (बंगली सांडोर). गटप्रमुख : यशवंत मांडवे, रोहिद यादव (बंगली सांडोर). उपविभागप्रमुख : चंद्रकांत खडसे (गिरीज विभाग). शाखाप्रमुख : रविशंकर सीरगीर (सलोली विभाग). उपशाखाप्रमुख : ज्ञानेश्वर तरे (सलोली विभाग). शाखाप्रमुख : समीर भरत गोतावळे (सिद्धार्थनगर), सचिन ईश्वर भाईस (दत्त धामवाडी), नंदुराज उत्तम राठोड (हेटकरआळी). शाखा समन्वयक : नीलेश सांबरे (हेटकरआळी). उपविभागप्रमुख : जयेश महेश पवार (घाटेआळी व हेटकरआळी). शाखाप्रमुख : विजय सोनवणे (घाटेआळी). विभागप्रमुख : कुणाल कोदे (पारनाका विभाग). उपविभागप्रमुख : रूपेश सुरेश पाटील (सुरतवाला व दीपमाळ), निखिल हाटे (पारनाका विभाग). शाखाप्रमुख : जयेश सोलंकी (सोमवार पेठ), शाहीर शेख (मुसाजी गल्ली), सलमान साठे (पिंजारवाडा), उदय चव्हाण (कुंभारवाडा), जितेश पवार (जामदरआळी). उपशाखाप्रमुख : मनीष गायकवाड (जामदरआळी). विभागप्रमुख : राकेश पाटील (झेंडाबाजार). उपविभागप्रमुख : धीरज राऊत (झेंडाबाजार). शाखाप्रमुख : मयूर राऊत (झेंडाबाजार). गटप्रमुख : ओमकार विश्वकर्मा (झेंडाबाजार). शाखाप्रमुख : प्रशांत पाटील (भंडारआळी). उपशाखाप्रमुख : निशांत ठाकूर (भंडारआळी). विभागप्रमुख : ओमकार भोपालगडे (भास्करआळी). उपविभागप्रमुख : प्रतीक मोरे (भास्करआळी). शाखाप्रमुख : अक्षय परब (भास्करआळी), जिग्नेश जगताप (श्रीनगर, भास्करआळी), मयूर राजगुरे (प्रभुआळी). गटप्रमुख : विशाल आगवणे (प्रभुआळी). विभागप्रमुख : सुनील राऊत (गिरीज). शाखाप्रमुख : समीर राऊत (गिरीज). उपशाखाप्रमुख : अमित म्हात्रे (गिरीज). विभागप्रमुख : रोहण वर्तक (मांडलई). विभाग समन्वयक : विपुल वर्तक (मांडलई). शाखाप्रमुख : भाग्येश वर्तक, प्रवीण धापशी (मांडलई). उपशाखाप्रमुख : रोहित वर्तक, जितेंद्र वर्तक (मांडलई). विभागप्रमुख : महेश पाटील (वाळसई). उपविभागप्रमुख : व्यंकटेश म्हात्रे (वाळसई). शाखाप्रमुख : चिराग पाटील (वाळसई). उपशाखाप्रमुख : अभिजित चौधरी, धवल राऊत (वाळसई). शाखाप्रमुख : मनीष चौधरी (खुंतोडी). गटप्रमुख : कौशिक पाटील, विक्रांत चौधरी (वाळसई). विभागप्रमुख : राहुल पाटील (रमेदी). उपविभागप्रमुख : धीरज वडले (रमेदी). शाखाप्रमुख : जितेंद्र पोतदार, संतोष पोतदार (रमेदी). उपशाखाप्रमुख : धीरज वर्तक, आकाश शहा (रमेदी). गटप्रमुख : संदीप धापशी, राजेश राऊत (रमेदी). शाखाप्रमुख : राहुल पडवळ (किल्ला रोड). उपशाखाप्रमुख : अशोक शिंदे (किल्ला रोड). विभागप्रमुख : हेमंत काटकर (पापडी). विभाग समन्वयक : विशाल कोळेकर (पापडी). उपविभागप्रमुख : ओमकार गुरव (पापडी). शाखाप्रमुख : केतन चौधरी (पापडी नाका), मोईन खान (पापडी वाझा मोहल्ला), मधुकर जाधव (पापडी घाटेआळी). उपशाखाप्रमुख : साहिल पाटील (पापडीनाका), शुभम गुप्ता (पापडी सोनारआळी), चिन्मय गुरव (पापडी राममंदिर), मनीष कोल्हे (पापडी बौद्धवाडा), जयवंत निञे (पापडी राममंदिर). विभागप्रमुख : गणेश पाटील (तरखड), अजय म्हात्रे (आक्टन), अभय गोडकर (होळी). उपविभागप्रमुख : दिनेश गुप्ता (होळी). शाखाप्रमुख : राजेश चुरी (होळी). उपशाखाप्रमुख : अजय शर्मा (होळी). विभागप्रमुख : राकेश गुरुनाथ कदम (उमेळा विभाग). विभाग समन्वयक : अविनाश वर्तक (उमेळा विभाग). शाखाप्रमुख : रोशन गुरुनाथ कदम, शरद वर्तक (उमेळा विभाग). उपशाखाप्रमुख : प्रशांत कदम, नितेश कांबळे (उमेळा विभाग). गटप्रमुख : शैलेश बाळकृष्ण भोसले (उमेळा विभाग). जिल्हा कार्यकारिणी सदस्य : दिलीप सुर्वे. वसई शहर समन्वयक : नीलेश भानुशे (वसई). उपशहरप्रमुख : प्रशांत कदम (वसई). तालुका समन्वयक : योगेश पाटील (वसई). तालुका कार्यकारिणी सदस्य : जयेश राऊत, सुरेश हटकर, दिलीप साफळे, मारुती झुंझरके (वसई). वसई शहर कार्यकारिणी सदस्य : मोहन चौधरी, चंद्रकांत घोंडे, सुरेश राणे, विजय घरत (वसई). शाखाप्रमुख : स्वप्नील चव्हाण (दर्जीआळी). विभागप्रमुख : चंद्रकांत मोटे (नायगाव कोळीवाडा). शाखाप्रमुख : योगेश बेनकर (नायगाव कोळीवाडा). उपशाखाप्रमुख : राहुल शेलार, जगन भाईदरकर, आबाजी बाळू सुळे. गटप्रमुख : धनंजय भाईदरकर. वसई तालुका कार्यकारी सदस्य : दीपक बडगुजर (वसई). विभागप्रमुख : नरेश पुलीपाटी (बाभोळा विभाग). उपशहरप्रमुख : भूपेश राऊत (वसई). उपविभागप्रमुख : हसमुख सूर्ती (दत्तानी). विभागप्रमुख : नितीन भगत. शाखाप्रमुख : सतीश भगत (मरियमनगर). उपशाखाप्रमुख : राजेश विश्वासराव, महेश चौरसिया, यशवंत वाक्कर यांच्या नियुक्त्या करण्यात आल्या आहेत.

CamScanner

Scanned with CamScanner

दि. ०८/०५/२०२३

सामना पा. नं. १

विरोधी पक्षांची भक्कम एकजूट

# भाजपला सक्षम पर्याय देणार

## शरद पवार यांचे स्पष्ट प्रतिपादन



पंढरपूर, दि. ७ (प्रतिनिधी) - देशातील सर्वाधिक राज्यांत भाजपेतर पक्षांचे सरकार आहे. जनता भाजपवर नाराज आहे. कर्नाटकात सत्तांतर होऊन पुन्हा काँग्रेसचे सरकार येईल असे चित्र आहे, असे नमूद करतानाच आगामी निवडणुकीत राष्ट्रीय पातळीवर विरोधी पक्षांची भक्कम एकजूट उभारून भाजपसमोर सक्षम पर्याय दिला जाईल, अशी ठाम भूमिका राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांनी आज मांडली.

पंढरपुरातील श्री विठ्ठल सहकारी कारखाना येथे पत्रकार परिषदेत शरद पवार बोलत होते. कर्नाटकमध्ये काँग्रेस सत्तेत येणार आहे. फक्त ५ ते ७ राज्यांतच भाजपचे सरकार आहे. देशभरात भाजपची घसरण होत आहे. केरळ, तामीळनाडूमध्ये आता भाजप नाही. तेलंगणा, आंध्र प्रदेशमध्येदेखील भाजपची तशीच अवस्था आहे. महाराष्ट्रात कसे सरकार आले तुम्ही पाहिलेच आहे. मध्य प्रदेशात कमलनाथ मुख्यमंत्री होते आणि तिथं भाजपला आता पुन्हा संधी नाही, असे नमूद करत शरद पवार यांनी विरोधी पक्षांच्या एकजुटीवर जोर दिला.

बंडखोर १६ आमदारांच्या अपात्रतेबाबत न्यायालयाचा लवकरच निकाल येणार आहे, ▪ पान ८

> सुप्रीम कोर्टाचा निकाल फडणवीस यांना माहिती असावा. त्यामुळेच ते 'मी पुन्हा येईन' असे म्हणत असावेत!

### जनतेला राज्यात बदल हवाय!

मी पक्षाच्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिल्यानंतर तो मागे घेऊ नये म्हणून भाजपच्या अनेक नेत्यांनी देव पाण्यात ठेवले होते. या सगळ्या घडामोडींनंतर महाविकास आघाडीची वज्रमूठ सैल झाल्याचेही भाजपचे नेते बोलत होते, मात्र तसे होणार नाही. महाविकास आघाडीतील आम्ही तिन्ही पक्ष आता नेटाने कामाला लागणार आहोत, असे पवार यांनी सांगितले. राज्यात शिंदे-फडणवीस सरकारविरोधात असंतोष आहे. जनतेला बदल हवा आहे, असेही पवार म्हणाले.

### महाविकास आघाडी कालही होती, आजही आहे, उद्याही राहील



'कार्यकर्ते, पक्षातील नेते आणि सर्वांच्या विनंतीला मान देऊन शरद पवार यांनी राजीनाम्याचा निर्णय मागे घेतला. राजीनाम्याचा विषय आता संपला असून, आता आम्ही पुन्हा कामाला लागलो आहोत. महाविकास आघाडीला कुठलाही धक्का लागणार नाही. आम्ही एकत्र होतो आणि एकत्र आहोत,' अशी ग्वाही विधानसभेचे विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी दिली.

▪ सविस्तर पान ५

---

सामना पा. नं. १




### तामीळनाडूत सर्व शो रद्द

▪ 'केरळ स्टोरी' या चित्रपटाचे सर्व शो रद्द करण्याचा निर्णय तामीळनाडूतील मल्टिप्लेक्स असोसिएशनने घेतला आहे. हा चित्रपट कायदा व सुव्यवस्थेला धोका ठरू शकतो असे त्यांचे म्हणणे आहे.

---

सामना पा. नं. ८

### महिलेचा मृत्यू

वसई : लाकडे तोडताना झाडावरून खाली पडून एका महिलेचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. जमुना खरपडे असे मृत महिलेचे नाव आहे. जेवण बनविण्यासाठी घराजवळील झाडावर चढून लाकडे तोडत असताना महिलेचा पाय घसरला आणि ती थेट खाली कोसळली. जखमी महिलेला रुग्णालयात दाखल केले. मात्र उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला.

---

सामना पा. नं. ८

### तरुण बुडाला

नालासोपारा : दारू पिऊन शेततळ्यात पोहण्यासाठी गेलेल्या तरुणाचा बुडून मृत्यू झाला. धर्मा तांमडा असे मृत तरुणाचे नाव आहे. वीटभट्टीवर काम करणारा धर्मा शनिवारी दुपारी कामण येथील एका शेततळ्यात पोहण्यासाठी उतरला. मात्र पाण्याचा अंदाज न आल्याने बुडून त्याचा मृत्यू झाला.

---

सामना पा. नं. ८

### फसवणूक

विरार : रूम देण्याच्या नावाखाली एका नौदल अधिकाऱ्याची लाखोंची फसवणूक करण्यात आल्याची घटना उघडकीस आली आहे. कुलाबा शहीद भगतसिंग रोड येथे राहणारे नौदल अधिकारी कमांडर आनंद अन्नानंदम यांची आरोपी दीपक शहा याच्याशी ओळख झाली. रूम देण्याच्या नावाखाली आरोपीने १७ लाख ५४ हजार रुपये घेऊन फसवणूक केली.

CS CamScanner

Scanned with CamScanner

दि. ०८/०५/२०२३

पुण्य नगरी पा. न. २

# मराठी माणसांच्या पाठीत खंजीर खुपसला – संजय राऊत



। मुंबई : कर्नाटकातील विधानसभा निवडणुकीत भाजपच्या प्रचारासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे कर्नाटकमध्ये दाखल झाले आहेत. मुख्यमंत्र्यांच्या या दौऱ्यावरून शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊतांनी टीका करताना एकनाथ शिंदे भाजपचा प्रचार करून मराठी माणसांच्या पाठीत खंजीर खुपसत असल्याचे ट्विट केले आहे.संजय राऊत यांनी ट्विटमध्ये म्हटले की, महाराष्ट्र एकीकरण समितीचे लोक उचापती आहेत, त्यांना आम्ही धडा शिकवू, असे कर्नाटकचे मुख्यमंत्री बोम्मई यांनी इशारा दिला आहे. त्याच बोम्मईंच्या पंखाखाली मुख्यमंत्री एकनाथ शिंदे वाहत आहेत. सीमावादानंतर शिंदे व त्यांची टोळी या भागात फिरकलीसुद्धा नाही. याउलट एकीकरण समितीच्या विरोधातील भाजप उमेदवारांना खोके पाठवून त्यांनी मराठी माणसांच्या पाठीत खंजीर खुपसला, अशी टीका केली. सीमा भागातील एकीकरण समितीचे उमेदवार पराभूत व्हावेत, म्हणून शिंदे यांनी जोर लावला आहे. त्यांची शिवसेना ही नकली शिवसेना आहे. शिंदे महाराष्ट्राचे वैरी आहेत. बाळासाहेबांनी या कृत्याबद्दल शिंदे यांची शिवसेनेतून हकालपट्टीच केली असती, अशी खोचक टीकाही संजय राऊत यांनी केली.

पुण्य नगरी पु. पा. न. १

# नाल्यातील बेकायदा बांधकामाविरोधात रासप आक्रमक

## भूमाफियांसह पालिका प्रशासन जबाबदार असल्याचा आरोप



। नालासोपारा : पश्चिमेकडे समेळ पाडा येथे नैसर्गिक नाल्याच्या बाजूला भराव करून कार्यालय थाटल्याने भविष्यात पाणी साचून नालासोपारा पाण्याखाली जाण्याची भीती व्यक्त होत आहे. वसई-विरार शहर महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी याकडे हेतुपुरस्सर दुर्लक्ष केल्याने असे प्रकार होत असल्याचे बोलले जात आहे. शेकडो वर्षापासून सोपारा गावच्या वेशीवर असलेला उघडी नाला (खाडी) मातीचा भराव करून रस्ता, तसेच कार्यालय निर्माण करणाऱ्या भूमाफियांना मदत करणाऱ्या प्रशासनाविरुद्ध नाल्यात उभे राहून निदर्शने करण्याचा इशारा रासपचे पालघर जिल्हाध्यक्ष नितीन पेंढारी यांनी दिला आहे.

पालिकेशी वारंवार पत्रव्यवहार करूनही असे प्रकार होत आहेत. सोपारा गावाच्या वेशीवरील उघडी नाला (खाडी), त्याची नैसर्गिक रुंदी, तसेच नैसर्गिक मार्ग काही भूमाफिया आणि पालिका अधिकाऱ्यांच्या मनमानी कारभारामुळे हरवून बसला आहे. खासकरून पावसाळ्यात हा नाला (खाडी) अतिक्रमणामुळे सोपारा गावाला जलमय करतो. त्यात घरांमध्ये पाणी शिरून, तसेच आठ-दहा दिवस गावात पाणी साचून रोगराईला निमंत्रण मिळते. नागरिकांचे आर्थिक नुकसानही होते.

महापालिका हद्दीत मार्केट, असे आरक्षित प्लॉट बेकायदा बांधकामाच्या विळख्यात आहेत. किमान शहरात सांडपाणी वाहणारा नाला (खाडी) जनतेसाठी मोकळा करावा. नाल्यातला मातीचा भराव, नाल्यावर (खाडी) बांधलेले नाल्याला नैसर्गिक लांबी, रुंदी प्राप्त करून द्यावी. येत्या १५ दिवसांत मागणी पूर्ण मान्य न झाल्यास नाल्यात उतरून निदर्शने करण्याचा इशारा नितीन पेंढारी यांनी दिला आहे.

पुण्य नगरी पु. पा. न. १

# अमली पदार्थ विक्रीप्रकरणी घोडबंदरात दोघांना अटक

## सुमारे ८ लाखांचा मुद्देमाल जप्त

। मीरा रोड । काशिमीरा परिसरातील घोडबंदर येथे मॅफिड्रॉन (एमडी) हा अमली पदार्थ विक्रीसाठी साठा करून ठेवलेल्या दोघांना पोलिसांनी अटक केली. त्यांच्याकडून १०५ ग्रॅम वजनाचा ८ लाख ४० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे.

शहरात काही महिन्यांपासून अमली पदार्थ विक्रीच्या प्रमाणात वाढ झाल्याचे दिसून येत आहे. पोलीस कारवाई करत असले तरी ती पुरेशी प्रमाणात नसल्याने अमली पदार्थांच्या तस्करीचे प्रमाण काही कमी होत नाही. यामुळे तरुण पिढी नशेच्या आहारी जाऊन वाममार्गाला लागत आहे. काशिमीरा पोलीस ठाणे हद्दीतील रेतीबंदर, घोडबंदर येथे एका चाळीत मोठ्या प्रमाणात मॅफिड्रॉन (एमडी) या अमली पदार्थाची विक्री केली जात असल्याची माहिती परिमंडळ १ मीरा रोड पोलीस उपआयुक्त जयंत बजबळे यांना शनिवारी मिळाली. त्यानुसार पथकासह छापा टाकला. त्यावेळी १०५ ग्रॅम वजनाचा ८,४०,००० रुपये किमतीचा मॅफिड्रॉन विक्री करण्यासाठी केलेला साठा दिसला. याप्रकरणी मरजहाँ ऊर्फ गुडीया ताजुद्दीन शेख व अली असगर हुसेन भाडेला (रा. रेतीबंदर, घोडबंदर) यांच्याविरुद्ध काशिमीरा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

CamScanner

Scanned with CamScanner

पुण्य नगरी पु. पा. न. १

# भाईंदरच्या धारावी किल्ल्यात आढळले पुरातन अवशेष!

## पुरातत्त्व विभागाकडून पाहणी, तपासणीस घेतले नमुने



**मीरा रोड :** भाईंदर पश्चिमेच्या उत्तन येथील धारावी किल्ला भागात पुरातत्त्व विभागाने पाहणी केली असता, तेथे पुरातन वस्तूंचे अवशेष सापडले आहेत. काही नमुने पुरातत्त्व विभागाने तपासणीस नेले आहेत. या भागात असलेल्या ऐतिहासिक पुरातन अवशेषांची माहिती मिळणार आहे.

उत्तन भागातील धारावी किल्ल्याच्या परिसरात मद्यपान व इतर गैरप्रकार चालत होते. त्याची दखल राज्य मानवी हक्क आयोगाने घेतली आहे. आयोगाने संबंधित विभागाला जबाबदार धरत न्यायालयात हजर राहण्याचे आदेश दिले. आयोगाने आदेश दिल्यानंतर पोलिसांनी त्याठिकाणी गस्त वाढवली, तर महापालिकेनेही ६ सीसीटीव्ही कॅमेरे बसवले आहेत. तसेच पालिकेने चिमाजी आप्पा स्मारकाजवळ २४ तास सुरक्षा रक्षक तैनात केले आहेत.

धारावी किल्ल्याबाबत आयोगाकडे २७ मार्च रोजी सुनावणी झाली. त्या वेळी माजी नगरसेवक तथा जंजिरे धारावी किल्ला जतन समितीचे रोहित सुवर्णा यांनी ऐतिहासिक धारावी किल्ल्याची माहिती मुख्य सचिवांकडे सोपवण्याची विनंती केली होती. त्यानुसार संबंधित विभागांनी आवश्यक माहिती मुख्य सचिवांकडे सादर करण्याचे आदेश दिले. याबाबत पुढील सुनावणी ६ जुलै रोजी होणार आहे.

त्या वेळी आयुक्त दिलीप ढोले यांनी १७ जानेवारी २०२२ रोजी पुरातत्त्व विभागाच्या मुंबई येथील कार्यालयास पत्र देऊन पुरातन तोफा, दगडी शिल्प इत्यादींची देऊन तपासणी करण्यास कळवले होते. किल्ल्याच्या ठिकाणी खोदकाम केल्यास पुरातन अवशेष मिळण्याची शक्यता असल्याचे आयुक्तांनी पत्रात सांगितले होते. नंतर आयोगाने पुरातत्त्व विभागाला पाहणीचे आदेश दिले होते. त्यानुसार पुरातत्त्व खात्याचे पुणे येथील पुरातत्त्व शास्त्रज्ञ प्रणित कुमार यांनी धारावी किल्ल्याची पाहणी केली.

डोंगरी-आनंदनगर येथे रस्त्याच्या कडेला असलेल्या दगडी शिल्पाची पाहणी केली असता, ते देहूगळ असून त्यावरील गाय-वासरू, स्तुप मिळाले आहेत. ते पाहून सुमारे २ हजार वर्षे जुने असण्याची शक्यता वर्तवली आहे. मिळालेल्या देहूगळचा बराचसा भाग हा जमिनीत असल्याने तो बाहेर काढल्यावर त्याची अधिक माहिती मिळणार आहे. देहूगळ हे मध्य प्रदेशात जास्त प्रमाणात सापडते. तसेच गोराई गावातील रस्त्यालगतच्या परिसरातही दगडी शिलालेख व पुरातन अवशेष आढळले आहेत.

### तपासणी अहवालानंतर मिळणार अधिक माहिती

वैराळे तलाव येथे पुरातन चर्चचे अवशेष आहेत. उत्तन, गोराई व मनोरी या धारावी बेटांवरील तिन्ही गावचे हे एकमेव चर्च होते. या संपूर्ण परिसराची पाहणी करत असताना पुरातत्त्व विभागाने पुरातन मातीच्या भांडीचे अवशेष, जुन्या भिंतीची माती, दगड, चिनी मातीच्या भांड्यांचे अवशेष इ. गोळा करून त्याची पडताळणी व तपासणीसाठी घेऊन गेल्याची माहिती मिळाली आहे. हा तपासणी अहवाल आल्यानंतर आणखी पुरातन अवशेषांची माहिती मिळणार आहे.

सकाळ पा. नं. १

# भ्रष्टाचार, बेरोजगारी हाच खरा दहशतवाद : प्रियांका



प्रियांका गांधी

बंगळूर, ता. ७ : 'दहशतवाद, राष्ट्रीय सुरक्षा आणि धर्म याविषयी पंतप्रधान बरेच बोलत आहेत; परंतु कर्नाटकातील जनतेला भेडसावत असलेल्या वास्तवातील समस्यांना त्यांनी स्पर्शही केला नाही. ४० टक्के दलाली, भ्रष्टाचार हा कर्नाटकातील खरा दहशतवाद आहे,' अशी टीका काँग्रेसच्या सरचिटणीस प्रियांका गांधी-वद्रा यांनी आज केली.

मंगळूरपासून ३० किलोमीटर अंतरावर असलेल्या मुल्की येथील कोल्नाड येथे रविवारी झालेल्या एका प्रचारसभेत त्या बोलत होत्या. त्या म्हणाल्या, 'ही निवडणुकीची वेळ आहे; नेते येतात आणि विविध विषयांवर बोलतात. काही दिवसांपूर्वी याच ठिकाणी मोदी यांनी दहशतवाद आणि राष्ट्रीय सुरक्षेबाबत भाष्य केले होते. कर्नाटकात हा निवडणुकीचा मुद्दा नाही. बहुधा त्यांचे अधिकारी भाषण तयार करत होते, तेव्हा त्यांना कोणतीही समस्या आढळली नाही.

## निवडणूक ही भविष्य बदलण्याची संधी!

कर्नाटकातील लोक ४० टक्के कमिशन, महागाई आणि बेरोजगारी या दहशतीचा सामना करत आहेत. आमदाराच्या मुलाकडून कोट्यवधी रुपये जप्त केले जात असताना कारवाई न होणे म्हणजे दहशतवाद होय. भाजप सरकारच्यां दहशतीमुळे दक्षिण कन्नडकडे एक बँक उरली आहे,' अशी टीका प्रियांका यांनी केली. निवडणूक ही तुमचे भविष्य बदलण्याची संधी असते, असे आवाहनही त्यांनी जनतेला केले.

सकाळ पा. नं. ३

# आरटीओ कर्मचाऱ्यांचे आज 'काम बंद' आंदोलन

## प्रलंबित मागण्यांसाठी संघटनेचा निर्णय

मुंबई, ता. ७ : राज्यातील प्रादेशिक परिवहन कार्यालयातील कर्मचाऱ्यांनी आपल्या विविध प्रलंबित मागण्यासाठी सोमवारी (ता. ८) दोन तास आंदोलन करण्याचा निर्णय मोटार वाहन विभाग (आरटीओ) कर्मचारी संघटने घेतला आहे. त्यामुळे राज्यातील सर्व आरटीओमधील कामकाज सकाळच्या सत्रात दोन तास ठप्प राहण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

शासनाच्या धोरणानुसार प्रत्येक विभागाचा आकृतिबंध तयार करणे बंधनकारक करण्यात आले आहे. आकृतिबंधाचा प्रस्ताव कर्मचारी संघटनेने प्रशासनास २०१६ मध्ये सादर केला होता. आकृतिबंध मंजुरीसाठी संघटनेने सलग सहा वर्षे लढा दिल्यानंतर त्यासंबंधीचा शासन निर्णय २३ सप्टेंबर २०२३ रोजी प्रसिद्ध झाला. शासन निर्णय प्रसिद्ध होऊन सहा महिन्यांहून अधिक काळ होऊनही आकृतिबंध कार्यान्वित झाला नाही. त्यामुळे कर्मचारी नाराजी व्यक्त करत आहेत.

विभागातील पदोन्नतीचे सत्र नाहक प्रलंबित ठेवले आहे. यामुळे कर्मचाऱ्यांचे आर्थिक नुकसान होत असून सेवाविषयक उन्नतीपासून वंचित ठेवले जात आहे, अशी तक्रार कर्मचाऱ्यांनी केली आहे.

वर्ग-२ची पदे कित्येक वर्षांपासून रिक्त आहेत. यामुळेही कर्मचारीवर्गात संताप आहे. शासन/प्रशासनाने मोटार वाहन विभागातील कर्मचाऱ्यांच्या रास्त मागण्यांवर त्वरित कार्यवाही करावी अन्यथा तीव्र संघर्षाशिवाय पर्याय राहणार नाही, असा इशाराही मोटार वाहन विभाग (आरटीओ) कर्मचारी संघटनेचे सरचिटणीस सुरेंद्र सरतापे यांनी दिली आहे.

CS CamScanner

Scanned with CamScanner

दि. ०८/०५/२०२३

सकाळ पु.पा. नं. १

# वसईत कचऱ्याची शास्त्रोक्त विल्हेवाट

## भोईदा पाडा क्षेपणभूमीवरील पंधरा लाख मेट्रिक टन कचरा होणार नष्ट

वसई, ता. ७ (बातमीदार) : वसई, विरार शहरांतील १५ लाख मेट्रिक टन कचरा हा वसई पूर्वेकडील भोईदा पाडा क्षेपणभूमीवर जमा आहे. महापालिका स्थापन झाल्यापासून घनकचरा व्यवस्थापन बारगळल्याने कचऱ्याचा डोंगर निर्माण झाला आहे. पर्यावरणाला बाधक ठरत असताना प्रशासनाने शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट लावण्यासाठी निविदा प्रक्रिया पूर्ण केली आहे. मेअखेरपर्यंत या कामाला सुरुवात केली जाणार असल्याने क्षेपणभूमी कचरामुक्त होणार आहे.

वसई, विरारमधील लोकसंख्या पाऊण कोटीच्या आसपास आहे. दुकानदार, गृहसंकुल, औद्योगिक वसाहतींमधून रोज ६०० टन कचरा जमा होतो. तो वसई पूर्वेला असणाऱ्या क्षेपणभूमीवर जमा केला जातो, परंतु शास्त्रोक्त पद्धतीने घनकचऱ्याचे व्यवस्थापन करण्यात महापालिकेला यश आले नव्हते. २०१३ हा कचऱ्याचे ओला आणि सुका असे वर्गीकरण करण्याचा प्रयत्न करण्यात आला होता; मात्र नागरिकांकडून या उपक्रमाला अपेक्षेप्रमाणे प्रतिसाद मिळाला नाही.

महापालिकेने घनकचरा व्यवस्थापन व्हावे म्हणून, चार विलगीकरण मशीन (ट्रोमेल) खरेदी केल्या, परंतु मोठ्या प्रमाणात कचरा जमा झाल्याने प्रदूषणाचा प्रश्न गंभीर होत आहे. त्यामुळे निविदा प्रक्रिया सुरू केली होती; मात्र याला प्रतिसाद मिळत नव्हता. आता या प्रकल्पाची निविदा प्रक्रिया पूर्ण झाल्याने गती येणार असून त्यामुळे शून्य कचरा मोहिमेला हातभार लागणार आहे.



**नवीन प्रकल्पाची वैशिष्ट्ये :**

- कचऱ्यातून वीजनिर्मिती
- १५ लाख मेट्रिक टन कचऱ्याची विल्हेवाट
- शास्त्रोक्त पद्धतीचा वापर
- कचराभूमीवर जाणाऱ्या वाहनासाठी रस्ते विकसित करणार
- कर्मचाऱ्यांच्या आरोग्याची काळजी
- व्यवस्थापनासाठी कार्यालय उभारणी
- स्वच्छतेसाठी स्वतंत्र व्यवस्था

वसई-विरार महापालिकेच्या गोखिवरे येथील क्षेपणभूमीवरील जमा झालेल्या कचऱ्याची शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट लावण्यासाठी निविदा प्रक्रिया पूर्ण झाली असून एका कंपनीला काम सोपवण्यात येणार आहे. टप्प्याटप्प्याने घनकचरा व्यवस्थापन केले जाणार असून मेअखेरीला कामाला सुरुवात करण्यात येणार आहे.

**- अनिलकुमार पवार, आयुक्त, वसई-विरार महापालिका**

### स्थानिक नागरिकांना दिलासा मिळणार

भोईदा पाडा या ठिकाणी औद्योगिक वसाहत आणि नागरिक वस्ती आहे. आजूबाजूच्या वस्तीला दुर्गंधीचा सामनादेखील करावा लागतो. त्यामुळे दुर्गंधीचा सामना करावा लागतो. तसेच नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न सतावत असतो. जर कचऱ्याची विल्हेवाट व्यवस्थापन योग्य झाले, तर प्रदूषण होणार नाही.

### सक्त ताकीद दिल्यानंतर उपाययोजना

वसई-विरार महापालिकेला प्रदूषण व पर्यावरण बिघडत असल्याने पर्यावरण विभाग व लवादाने सुनावले होते, तसेच दंडदेखील आकारला होता. प्रदूषण रोखा, कचऱ्याचे नियोजन करा, अशा सूचना केल्या होत्या. त्यानंतर पालिकेने पावले उचलण्यास सुरुवात केली आहे.

Scanned with CamScanner

दि. ०८/०४/२०२३

सकाळ पु. पा. नं. १

# क्लस्टर योजनेमध्ये कोळीवाडे नकोच!

## पुनर्विकासाला मच्छीमारांचा विरोध

भाईंदर, ता. ७ (बातमीदार) : मोडकळीस आलेल्या इमारती, चाळी, अनधिकृत बांधकामे, झोपडपट्ट्या यांचा पुनर्विकास करण्यासाठी मिरा-भाईंदर महापालिकेने क्लस्टर योजना हाती घेतली आहे. या योजनेची अधिसूचना जारी करून महापालिकेने २४ क्षेत्रांचे नकाशे जारी केले आहेत, परंतु या क्लस्टरमध्ये कोळीवाड्यांचा समावेश करण्यासाठी मच्छीमारांनी विरोध केला आहे. क्लस्टरमुळे देशोधडीला लागणार असल्याचे मच्छीमारांचे म्हणणे आहे.

ज्या क्षेत्रांचा पुनर्विकास क्लस्टर योजनेद्वारे शक्य आहे, अशा क्षेत्रांचे सर्वेक्षण करून महापालिकेने त्यांचे नकाशे नुकतेच जाहीर केले आहेत. हे नकाशे नागरिकांच्या माहितीसाठी महापालिका कार्यालयात ठेवण्यात येणार आहेत, परंतु क्लस्टर योजनेत कोळीवाड्यांचा समावेश करण्यास मच्छीमारांनी ठाम विरोध केला आहे. अखिल महाराष्ट्र मच्छीमार कृती समितीने एक निवेदन महापालिका आयुक्तांसह मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, अतिरिक्त मुख्य सचिव व ठाणे जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहे. महापालिकेने क्लस्टरसाठी निश्चित केलेल्या क्षेत्रांमध्ये उत्तन येथील चौक, पाली, भाटेबंदर या परिसराचाही समावेश आहे. या ठिकाणी बहुतांश कोळीवाडे आहेत. कोळीवाड्यांतील घरांची नाळ ही मासेमारी व्यवसायाशी घट्टपणे जोडलेली आहे, असे मच्छीमारांचे म्हणणे आहे.

> मच्छीमारांच्या जमिनी मुंबई पोर्ट ट्रस्ट, महसूल विभागाच्या मालकीच्या आहेत. काही जमिनींचे सात-बारा उतारे मच्छीमारांच्या नावेदेखील आहेत. असे असताना कोळीवाड्यांचा क्लस्टरमध्ये समावेश करणे ही मच्छीमारांची फसवणूक आहे.
> **- बर्नड डिमेलो**, कार्याध्यक्ष, महाराष्ट्र मच्छीमार कृती समिती

### देशोधडीला लागण्याची भीती

मच्छीमार समाज गेल्या दोन दशकांपासून राहत्या घरांखालील जमिनी नावावर होण्यासाठी संघर्ष करत आहेत. सत्तेत आलेल्या प्रत्येक सरकारने मच्छीमारांच्या या भूमिकेचे समर्थन केले आहे. राज्यातील सातही सागरी जिल्ह्यांमधील मच्छीमारांच्या राहत्या घरांखालील जमिनी त्यांच्या नावे करण्याची प्रक्रियादेखील सुरू झाली आहे. अनेक कोळीवाड्यांचे सीमांकन करून त्यांची हद्ददेखील निश्चित करण्यात आली आहे. भविष्यात देशोधडीला लागण्याची मच्छीमारांना भीती आहे.

CamScanner
Scanned with CamScanner

# बिटकॉइन ॲपमध्ये पैसे गुंतवून फसवणूक

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : बिटकॉइन ॲपमध्ये पैसे गुंतवण्यास सांगून एकाची आर्थिक फसवणूक करण्यात आली आहे. मनवेलपाडा रोड येथील पौर्णिमा अपार्टमेंटमध्ये राहणाऱ्या सिद्धेश दीपक देसाई (२९) यांची ५ ते ८ मार्चदरम्यान टेलिग्राम ग्रुपच्या माध्यमातून दोन आरोपींनी बिटकॉइन ॲपमध्ये पैसे गुंतवल्यात ३० टक्के अधिक नफा मिळेल, असे आमिष दाखवून ऑनलाइनने एक लाख ३६ हजार रुपये घेऊन फसवणूक केली. शनिवारी विरार पोलिसांनी फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे.

Scanned with CamScanner

लोकमत

# बनावट कार्ट्रेज बनवून फसवणूक

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : ब्रँडेड कंपनीच्या बनावट प्रिंटिंग कार्ट्रेज बनवून कंपनीची फसवणूक केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. वसईच्या शिवाजीनगर, इम्रान कॅम्प येथे गाळा नंबर सहामध्ये एप्सॉन इंडिया या कंपनीकडून बनविण्यात येणारे प्रिंटर कार्ट्रेज व शाई कंपनीचे मॅन्युफॅक्चरिंग नसल्याची तक्रार कंपनीच्या वतीने पेल्हार पोलिस ठाण्यात करण्यात आली होती. त्यानुसार पोलिसांनी शुक्रवारी या ठिकाणी धाड टाकून ३७ लाख ५८ हजार ३५१ रुपये किमतीचा बनावट माल जप्त केला आहे. पोलिसांनी शनिवारी मॅनेजर नारायण कर्मण ववीया व कंपनीचा मालक यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

Hello Vasai
Page No. 1 May 08, 2023
Powered by: erelego.com

Scanned with CamScanner

# Short-staffed force to get 996 more cops

## Existing strength limited to 1,903 constables including 1,649 male and 253 female; 1,237 posts for drivers

**MBVV POLICE RECRUITMENT**



SURESH GOLANI
Mira-Bhayandar

Nearly three years after the state government elevated the rural format of the Thane and Palghar police to a combined Mira Bhayandar Vasai Virar (MBVV) commissionerate in October 2020, the short-staffed force will soon get 996 constables as fresh recruits.

The existing strength is limited to 1,903 constables (1649 male and 253 female) and 368 police officials, which is 37% less than the required manpower.

Most of these vacancies belonged to the constabulary section and the fresh recruitment of 996 constables will add teeth to the short-staffed police force.

Right from patrolling, administrative work to detection, constables play a very important role in the policing apparatus.

The process to recruit including 986 police constables and 10 police constable drivers began on January 2, this year. A total of 71,951 applications including 59,847 from male and 12,104 female aspirants had been received for the police constable's job, in addition to 1,237 applicants including 1,196 male and 41 female aspirants in the fray for the constable driver posts, officials said.

Out of the 12,127 eligible candidates including 8,858 male and 3,269 female, only 9,999 (7721 male and 2278 female) registered their presence for the examinations, while 2,218 candidates remained absent. The examination process for the mega recruitment drive is divided into two parts, physical and written tests of 50 marks and 100 marks, respectively.

The process was on to verify the documents of the aspirants who cleared their physical and written test, following which they will be sent for training before joining the force. At present, there are 17 police stations under the jurisdiction of the MBVV commissionerate.

Scanned with CamScanner

1997 से
KAT खबरें आज तक
not a publication of the living media india group
वर्ष: 26 अंक-322 मुंबई, रविवार 7 मई 2023 पृष्ठ-12 मूल्य :2.00

# पिस्टल व कारतूस के साथ पकड़े गए दो आरोपी

**वसई:** पेल्हार पुलिस स्टेशन की क्राइम डिटेक्शन सेल की टीम ने 2 लोगो को एक पिस्टल व एक जिंदा कारतूस के साथ गिरफ्तार किया है। यह कार्रवाई परिमंडल 3 डीसीपी सुहास बावचे व एसीपी रामचंद्र देशमुख के मार्गदर्शन में पेल्हार पुलिस स्टेशन के सीनियर पीआई वसंत लब्दे के नेतृत्व में पीएसआई सनिल पाटील की टीम ने की है। पुलिस अधिकारी ने बताया कि क्राइम डिटेक्शन को 4 मई को गुप्त सूचना मिली कि आर्म स्ट्रॉग इंडीया कन्ट्रक्शन आरएमसी प्लॅन्ट कंपनी के सामने,रिचर्ड कंपाऊन्ड,मनिचापाडा, पेल्हार,नालासोपारा पूर्व इस स्थान पर दो शख्स बिना लाइसेंस और अवैध अग्निशस्त्र लेकर आने वाले है।जिसके बाद सूचना के आधार पर क्राइम डिटेक्शन सेल की टीम ने उक्त स्थान पर जाल बिछाया और आरोपी 1).मोईन अन्वर शेख व 2). शकील अहमद इसरार खान को हिरासत में लिया,पुलिस ने आरोपियों की तलाशी ली तो इनके पास से 1 स्वचालित (ऑटोमैटिक पिस्टल ) व 1 जिंदा कारतूस कुलमिलाकर 25,200 रुपये का माल पाया,पुलिस ने उक्त हथियार को बरामद कर दोनो को गिरफ्तार किया है।पुलिस ने कहा कि दोनो आरोपियों के ऊपर आर्म एक्ट के तहत केस दर्ज किया है।आगे की तहकीकात कर रही है।



Scanned with CamScanner